महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २०९ वे | दिनांक : २३/०७/२०२६ | वार : गुरुवार

## जंतर-मंतर प्रकरण टाळता आले असते; मोदी-शहा तोडगा काढतील - छगन भुजबळ



**नाशिक :** दिल्लीतील जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलन, पोलिसांची कारवाई आणि विरोधी पक्षाच्या आंदोलनावर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी आपली भूमिका मांडली आहे. "जंतर-मंतरवर घडलेल्या घटना टाळता आल्या असत्या. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर वेळेत तोडगा निघाला असता तर ही परिस्थिती निर्माण झाली नसती," असे मत त्यांनी व्यक्त केले. त्याचवेळी "सरकारविरोधात लोकमत तयार करणे हे विरोधी पक्षाचे कामच आहे," असेही त्यांनी स्पष्ट केले. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमानंतर पत्रकारांशी संवाद साधताना भुजबळ यांनी जंतर-मंतरवरील आंदोलनाबाबत प्रतिक्रिया दिली.

दिल्लीतील आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज झाल्याच्या आणि राहुल गांधी व प्रियंका गांधी यांना ताब्यात घेतल्याच्या प्रश्नावर भुजबळ म्हणाले की, “या घटना यातनादायी आहेत. या सगळ्या गोष्टी टाळता आल्या असत्या तर अधिक चांगले झाले असते.” ते पुढे म्हणाले, "मोर्चांमध्ये हजारो लोक असतात. काही उत्साही कार्यकर्ते पोलिसांचा बंदोबस्त तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी पोलिसांना कारवाई करावी लागते. मात्र, कारवाई करतानाही संयम राखण्याची गरज असते." या संपूर्ण प्रश्नावर केंद्र सरकार योग्य तो मार्ग काढेल, असा विश्वासही भुजबळ यांनी व्यक्त केला. "हा प्रश्न पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह योग्य पद्धतीने सोडवतील, असा मला विश्वास आहे," असे ते म्हणाले. जंतर-मंतर आंदोलनाचे राजकारण होत असल्याच्या प्रश्नावर भुजबळ यांनी विरोधी पक्षांची भूमिकाही मान्य केली. "सरकारच्या विरोधात संधी मिळाली की त्याचा राजकीय मुद्दा करणे आणि सरकारविरोधात लोकमत निर्माण करणे हे विरोधी पक्षाचे कामच असते. त्यामुळे विरोधक त्यांचे काम करत आहेत," असे त्यांनी सांगितले. पर्यावरणवादी सोनम वांगचूक यांच्या आंदोलनाचा संदर्भ देत भुजबळ म्हणाले, "जेव्हा सोनम वांगचूक आंदोलनाला बसले होते, त्याच वेळी सरकारने तोडगा काढला असता, तर पुढील घटना घडल्या नसत्या. आता जे घडले ते आपल्या सर्वांसमोर आहे. या सगळ्या गोष्टी टाळता आल्या असत्या तर अधिक चांगले झाले असते." यावेळी छगन भुजबळ यांनी दिवंगत अजित पवार यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. शेतकरी, विद्यार्थी, महिला, सहकार आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील, असे ते म्हणाले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देत, "फडणवीस हे कष्टाळू आणि विकासाभिमुख नेतृत्व आहे," असे गौरवोद्गारही त्यांनी काढले. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटित राहिल्याचे सांगत, महिला नेतृत्वाला सर्वांनी पाठिंबा देण्याचे आवाहनही भुजबळ यांनी केले.

## २४ जुलैला शिवाजी पार्कवर 'वन नेशन, वन इमोशन' आंदोलन



**मुंबई :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी २४ जुलै रोजी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे 'वन नेशन, वन इमोशन' या नावाने शांततापूर्ण आंदोलनाची हाक दिली आहे. दिल्लीतील आंदोलनावरील पोलिस कारवाई, देशभरातील विद्यार्थ्यांची धरपकड आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना ताब्यात घेतल्याच्या निषेधार्थ हे आंदोलन आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सोशल मीडियावरील पोस्टमधून स्पष्ट केले. आदित्य ठाकरे यांनी नागरिकांना २४ जुलै रोजी सायंकाळी ४ वाजल्यापासून शिवाजी पार्क येथे उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. सायंकाळी ५ वाजता सर्वांनी हातात तिरंगा घेऊन एकत्रितपणे राष्ट्रगीत गायचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

आपल्या पोस्टमध्ये आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे की, दिल्लीतील कथित दडपशाही, देशभरातील विद्यार्थ्यांची धरपकड आणि जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समर्थनासाठी हे शांततापूर्ण आंदोलन आहे. महाराष्ट्र हा देशासाठी लढणाऱ्या धाडसी युवकांसोबत ठामपणे उभा असल्याचा संदेश या आंदोलनातून दिला जाणार आहे. त्यांनी पर्यावरणवादी सोनम वांगचूक, विद्यार्थी नेता अभिजीत दिपके आणि जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या सर्व आंदोलकांच्या समर्थनासाठी नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

आदित्य ठाकरे यांनी आपल्या पोस्टमध्ये राहुल गांधी यांच्यावरील कारवाईचाही उल्लेख केला आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इतर खासदारांना आंदोलनादरम्यान ताब्यात घेण्यात आले. जर हे त्यांच्यासोबत होऊ शकते, तर उद्या सामान्य नागरिकांसोबतही होऊ शकते, असा दावा त्यांनी केला. तसेच आंदोलनातील महिला आणि पुरुषांवर करण्यात आलेल्या कथित पोलिस बळाच्या वापराचाही त्यांनी निषेध केला आहे.

हे आंदोलन कोणत्याही पक्षाचा कार्यक्रम नसून देशभक्त नागरिकांचे शांततापूर्ण आंदोलन असल्याचे आदित्य ठाकरे यांनी स्पष्ट केले आहे. हातात तिरंगा घेऊन राष्ट्रगीत गात देशभक्ती व्यक्त करण्याचे आणि सत्ताधाऱ्यांकडून उत्तरदायित्वाची मागणी करण्याचे हे व्यासपीठ असल्याचे त्यांनी नमूद केले.

या आंदोलनात कोणत्याही पक्षाचे झेंडे आणू नयेत, असे आवाहन करत आदित्य ठाकरे यांनी सर्व राजकीय पक्ष, विविध विचारसरणीचे नागरिक आणि भारतीय युवकांना चांगले भविष्य मिळावे असे वाटणाऱ्या प्रत्येकाने सहभागी व्हावे, असे म्हटले आहे. पोस्टच्या शेवटी त्यांनी "जय हिंद! जय महाराष्ट्र! वंदे मातरम्!" अशा घोषणांसह आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## लाठीचार्जला विरोधकच जबाबदार; उदय सामंतांचा दावा



**मुंबई :** राजधानी दिल्लीत विद्यार्थी आणि 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जवरून देशभरात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेवरून विरोधकांनी सत्ताधारी मोदी सरकारवर जोरदार निशाणा साधला असताना, सत्ताधाऱ्यांकडून मात्र पोलिसांच्या कारवाईची पाठराखण केली जात आहे. यासंदर्भात राज्याचे मंत्री उदय सामंत यांनी एक वेगळाच दावा करत या घटनेचे खापर थेट विरोधकांवर फोडले आहे.

मंत्री उदय सामंत म्हणाले, माझा लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाविषयी आदर असून, अभिजीत दिपके यांच्या माणसाने दिल्ली पोलिसांना मारहाण केली असे मी म्हणत नाही. मात्र या आंदोलनात विरोधी पक्षाच्या लोकांनी बाहेरून घुसखोरी करून हे कृत्य केल्यामुळेच पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला, असे सामंत यांनी म्हटले आहे. तसेच, विरोधकांनी आंदोलनात घुसखोरी केली नसती तर लाठीचार्जची वेळच आली नसती, असा आरोप करत त्यांनी पोलिसांच्या कारवाईचे समर्थन केले आहे.

उदय सामंत म्हणाले, नीट पेपरफुटीवरुन सुरू असलेल्या आंदोलनातील अभिजीत दिपके आणि विद्यार्थी यांच्याबद्दल आम्हाला शंभर टक्के आदरणीय सहानुभूती आहे. पण बाहेरून येऊन काहीजण नाटक करत आहेत. तसेच कोळसा, बोफोर्स किंवा टेलिकॉममध्ये भ्रष्टाचार झाला म्हणून राजीनामा मागितला जात नाही. तर विद्यार्थ्यांचे जीव गेले, त्याची संवेदना म्हणून हा राजीनामा मागितला जात आहे. त्यांना टार्गेट करण्यापेक्षा सिस्टम सुधारली पाहिजे आणि त्यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करत आहे, असे सामंत यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना उदय सामंत म्हणाले, दिल्लीतील नीट पेपरफुटी प्रकरणाच्या या आंदोलनात विरोधक स्वार झाले आहेत.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २३ जुलै २०२६


## पूजा सोपान धनवटे यांना अर्थशास्त्र विषयांमधील पीएचडी पदवी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर अंतर्गत मानव विज्ञान विद्याशाखेंतर्गत पीएचडी अर्थशास्त्र पदवीसाठी सादर करण्यात आलेल्या प्रबंधाची मौखिक परीक्षा, संशोधन केंद्र गांधी महाविद्यालय कडा येथे संपन्न झाली, अहमदनगर जिल्ह्यातील कृषी विपणन व्यवस्थेची सद्यस्थितीत असलेल्या समस्यांच्या उपाय योजनांचा अभ्यास या विषयावर गांधी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर अशोक कोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधक विद्यार्थिनी कु. पूजा सोपान धनवटे यांनी अभ्यास केला, या मौखिक परीक्षेचे अध्यक्ष प्राध्यापक डॉ चंद्रकांत कोकाटे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर हे होते, तर बहिस्थ परीक्षक म्हणून प्राध्यापक डॉ देविदास हरगिले, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, एस के पाटील कॉलेज ऑफ सिंधुदुर्ग, मालवण जिल्हा सिंधुदुर्ग यांचे परीक्षक म्हणून मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले, गांधी महाविद्यालय कडा येथील प्राचार्य डॉ जवाहरलाल भंडारी, प्रोफेसर डॉ शिवराज पाताळे, प्रोफेसर डॉ श्रीकांत मगर, प्रोफेसर डॉ पांडुरंग अनारसे, प्रोफेसर डॉ चंद्रशेखर तळेकर, प्रोफेसर डॉ राजकुमार थोरवे, प्रोफेसर सुपर्णा देशमुख, प्रोफेसर मीरा नाथ,प्रोफेसर धनश्री मुनोत, प्रा सचिन ढगे, श्री ज्ञानेश्वर खंदारे, श्री दीपक जगदाळे, तसेच संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते, विद्यार्थी पूजा धनवटे यांनी सदर विषयाचा सखोल अभ्यास केला, प्रस्तुत विषयाचे महत्त्वाचे निष्कर्ष आणि उपाययोजनाचा सविस्तरपणे आढावा घेतला, मौखिक परीक्षेमध्ये संशोधक विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून विषयाची उपयुक्तता महत्त्व अभ्यासले,, प्रोफेसर डॉ अशोक कोरडे यांचे पाच विद्यार्थी पीएचडी झालेले आहेत, पाच पैकी चार जण प्राध्यापक म्हणून नियुक्त झालेले आहेत,. प्रोफेसर अशोक कोरडे पा,अर्थशास्त्र विभाग प्रमुख,एस के गांधी महाविद्यालय कडा,तालुका आष्टी जिल्हा बीड,

## डॉ.सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात ए आय टूल्स मास्टर टीचर ट्रेनिंग' चा उत्साहात समारोप



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ .इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयातील आय क्यू ए सी तर्फे आयोजित आठ दिवसीय 'AI Tools Master Teacher Training Program' चा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात झाला. बदलत्या शैक्षणिक युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आधारित तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर शिक्षकांना करता यावा, या उद्देशाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल, अक्षरा कम्प्युटरच्या संचालिका शैलजा वसेकर ,कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. परभाणे , आय क्यू ए सी समन्वयक डॉ. पराग चौधरी यांची उपस्थिती होती. या प्रशिक्षण कालखंडात प्राध्यापकांना ChatGPT, Gemini, Bhashini, Sarvam, QuillBot, Google Docs Voice Typing, Google Lens, Google Forms, Adobe Firefly, Canva, Remove.bg, HeyGen, InVideo AI, Suno, Gamma, Google Slides, Google Sheets, Google One इत्यादी आधुनिक एआय साधनांची प्रत्यक्ष माहिती व प्रात्यक्षिके देण्यात आली. सौ शैलजा वसेकर व त्यांच्या सहकारी सौ शितल देशपांडे यांनी मार्गदर्शन केले.आठ दिवसांच्या प्रशिक्षणात प्रॉम्प्ट रायटिंग, धडानियोजन (Lesson Plan), प्रश्नपत्रिका निर्मिती, भाषांतर, स्पीच-टू-टेक्स्ट, टेक्स्ट-टू-स्पीच, व्हिडिओ डबिंग, व्हॉईस क्लोनिंग, एआय प्रतिमा निर्मिती, पोस्टर व प्रमाणपत्र तयार करणे, शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती, एआय अवतार, संगीत निर्मिती, इंटरॲक्टिव्ह सादरीकरणे, डेटा विश्लेषण, गुगल फॉर्मद्वारे ऑनलाइन चाचणी तयार करणे इत्यादी विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये प्राध्यापकांनी एआयच्या साहाय्याने पीपीटी प्रेझेंटेशन, ऑडिओ, व्हिडिओ तयार केले. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या सर्व शिक्षकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.यावेळी शैलजा वसेकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की तुम्ही या सर्व टूल्सचा दैनंदिन अध्यापनात जितका जास्त वापर कराल तितके अध्यापन जास्त आकर्षक आणि परिपूर्ण होईल . अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. अनिता अग्रवाल यांनी सांगितले की, एआय ही शिक्षकांची जागा घेणारी नव्हे, तर अध्यापन अधिक प्रभावी, आकर्षक आणि विद्यार्थी-केंद्रित करणारी सहायक तंत्रज्ञान प्रणाली आहे. या प्रशिक्षणामुळे शिक्षकांच्या डिजिटल कौशल्यात भर पडून आधुनिक शिक्षणपद्धतीचा अवलंब करण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.मिनाक्षी देव यांनी केले तर प्रास्ताविक आणि आभार प्रगटन डॉ. पराग चौधरी यांनी केले. या प्रशिक्षणाबद्दल प्रा .परभाणे , डॉ. श्रीगिरिवार, प्रा. वरपडे, प्रा. पूजा मुद्दे यांनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. हे प्रशिक्षण महाविद्यालयातील 60 प्राध्यापकांनी पूर्ण केले.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २३ जुलै २०२६


## ज्ञानेश्वर विद्यालयात माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जयंती साजरी




**छत्रपती संभाजीनगर :** स्थानिक बेगमपुरा भागातील ज्ञानेश्वर विद्यालयात राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जयंती नुकतीच मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यालयातील 'कै.पंढरीनाथ पाटील शिसोदे उर्फ भाऊ सभागृहामध्ये' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.प्रशालेच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाचे पर्यवेक्षक संभाजी तांगडे तसेच उपस्थित सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या हस्ते अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व त्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी शिक्षक भरत झोडपे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी अजितदादा पवार यांच्या कार्यपद्धतीविषयी आणि त्यांच्या राजकीय वाटचालीविषयी उपस्थितांना माहिती दिली.या कार्यक्रमाला ज्ञानेश्वर विद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आवर्जून उपस्थित होते. अत्यंत खेळीमेळीच्या आणि उत्साही वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला.

# पथनाट्यातून व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश; जि.प. शाळा धोत्रा येथे जनजागृती



**सिल्लोड (प्रतिनिधी) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोत्रा येथे व्यसनमुक्ती पंधरवाड्यानिमित्त प्रभावी जनजागृती सिल्लोड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धोत्रा येथे व्यसनमुक्ती पंधरवाडा निमित्त विद्यार्थी व ग्रामस्थांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्यासाठी प्रभावी पथनाट्य सादर करण्यात आले.हा उपक्रम श्रीमती सरला कामे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्यात तंबाखू, गुटखा, दारू तसेच इतर व्यसनांचे दुष्परिणाम प्रभावीपणे मांडत व्यसनमुक्त समाज घडविण्याचा संदेश दिला. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट अभिनयाचे व सादरीकरणाचे कौतुक केले.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. डी. जे. जाधव यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांपासून दूर राहण्याची शपथ देत निरोगी व व्यसनमुक्त जीवन जगण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. दिनकर चव्हाण, श्रीमती ललिता कामे, श्रीमती रत्नप्रभा बोर्डे, श्री. आत्माराम सोन्ने आणि श्री. जयंत पाताळयंत्री यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री सिद्धेश्वर मंदिर विकासासाठी सुनील भोंबे यांची ₹४.२१ लाखांची देणगी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : जिंतूर येथील पुरातन काळातील श्री सिद्धेश्वर मंदिराच्या विकासासाठी सामाजिक बांधिलकी जपत उद्योजक व समाजसेवक सुनील भोंबे पाटील यांनी ₹४ लाख २१ हजारांची देणगी धनादेशाद्वारे मंदिर समितीकडे सुपूर्द केली. या उदात्त योगदानाबद्दल मंदिर समितीतर्फे त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागोराव जाधव होते. प्रमुख उपस्थितीत ॲड. विजयराव देशमुख, नगराध्यक्ष प्रताप देशमुख, नगर सेवक गोपाळ रोकडे, डॉ. दुर्गादास कानडकर, दत्तराव गाडेकर व गंगाप्रसाद घुगे, प.स. अध्यक्ष किशोर खिस्ते, यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थितीत सुनील भोंबे पाटील यांनी मंदिर विकासासाठीचा धनादेश मंदिर समितीकडे सुपूर्द केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. विजयराव देशमुख यांनी केले. यावेळी नागोराव जाधव व नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांनी मनोगत व्यक्त करत, श्री सिद्धेश्वर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी भाविक व दानशूर व्यक्तींनी अशाच प्रकारे पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. भाविकांच्या सहकार्यामुळे मंदिरासह परिसराचाही विकास साधता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमाचे आभार विष्णू गाडेकर यांनी मानले. कार्यक्रमास व्यापारी, मंदिर समितीचे सदस्य व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २३ जुलै २०२६

## पाऊस

पावसाच्या सरी आल्या
टप टप टप
भिजायचे आता
खूप खूप खूप

पावसा सोबत पडे
पांढऱ्याशुभ्र गारा
अंगाला झोंबायचा
गार गार वारा

व्याकूळलेली धरती
तृप्त आता झाली
वृक्ष, लता, वेली
पावसात न्हाली

आकाशी इंद्रधनूने
केली सुरेख कमान
सप्तरंग उधळूणी
वाढविली निसर्गाची शान

किलबिल किलबिल
पक्षी गीत गाती
गंधीत झाली
ओली माती



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे पदवी प्रदान समारंभ उत्साहात संपन्न




**कन्नड (प्रतिनिधी) :** श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, कन्नड संचलित शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात पदवीदान समारंभ अत्यंत दिमाखदार आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. ता. 21 रोजी झालेल्या या सोहळ्याला विद्यार्थी, पालक, प्राध्यापक आणि मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली.या समारंभासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि एम. जी. एम. विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव चंद्रकांतराव देशमुख होते. मंचावर उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, फार्मसीचे प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर, डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. व्ही. पी. देशपांडे, डॉ. उदय डोंगरे, डॉ. मीना आणि डॉ. विजय मातकर यांची उपस्थिती होती. यांच्या प्रमुख उपस्थितीत संपूर्ण सोहळा पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात दिप्रज्वलन करून व विद्यापीठ गीताने झाली. उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. सुधीर गव्हाणे यांच्या हस्ते विविध शाखांमधील पदवीधर विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. यावेळी बोलताना डॉ. गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानासोबत प्रामाणिकपणा, सातत्य आणि समाजाप्रती असणाऱ्या जबाबदारीची जाणीव करून दिली. पदवी म्हणजे केवळ शैक्षणिक यश नसून समाजासाठी काहीतरी करण्याची संधी आहे असे सांगत त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे. पदवी घेतल्यानंतर तुमची जबाबदारी वाढली आहे. महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात चमकला पाहिजे असे मत व्यक्त केले.पदवी प्रदानानंतर डॉ. गव्हाणे यांनी महाविद्यालयातील विविध विभागांना भेटी दिल्या. त्यांनी उपलब्ध सुविधा आणि शैक्षणिक उपक्रमांची पाहणी करून महाविद्यालयाच्या कार्याचे कौतुक केले. पदवी मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि शिक्षकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत होते. पालकांनीही आपल्या पाल्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. के. एल. भानुसे यांनी केले डॉ. सुनील गोर्डे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.तर आभार प्रदर्शन डॉ. प्रतिभा अहिरे यांनी मानले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष प्रयत्न केले. या पदवी प्रदान समारंभामुळे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला असून पुढील वाटचालीसाठी त्यांना नवी प्रेरणा मिळाली.

## मनातील जात अजूनही जिवंत आहे...

मनातील जात अजून जिवंत आहे,
म्हणून माणूस रोज मरत आहे;
हात मिळवताना हसतो चेहरा,
पण मनात विटाळ भरत आहे.

संविधानाच्या शपथा घेतो,
समतेच्या गप्पा रंगवतो;
घरी जाताच जातीच्या नावाने,
माणसालाच दूर लोटतो.

अस्पृश्यता कुठे संपली म्हणता?
ती तर मनात घर करून बसली;रस्ते बदलले,
कपडे बदलले,
पण विचारांची राख तशीच उरली.

मंदिर खुले, शाळा खुल्या,
खुली झाली सगळी दारे;
पण मनामधल्या बंद कुलुपांना,
कोण उघडणार सारे?

जात विचारून मैत्री होते,
जात विचारून नाती जुळतात;
जात विचारून माणसं मोजणारे,
समतेची भाषा कशी बोलतात?

स्पर्शाने कधी विटाळ होत नाही,
विटाळ असतो मनाच्या जातीला;
माणूस मारणाऱ्या त्या विचारांना,
आग लावा आजच छातीला.

बाबासाहेबांनी दिला संविधान,
फुल्यांनी दिला ज्ञानाचा दीप;
शाहूंनी दिला समान हक्क,
तरी का जिवंत जातीचं पीक?

मनातील जात जाळल्याशिवाय,
समतेचा सूर्य उगवणार नाही;
बंधुतेच्या फुलांना सुगंधही,
द्वेषाच्या मातीत फुलणार नाही.

उठा, मोडा जातीची साखळी,
तोडा मनातील प्रत्येक भिंत;
माणूसपणाचा ध्वज उंच धरा,
हाच क्रांतीचा खरा मंत्र निश्चित.

कारण -
मनातील जात मेली की,
माणूस खऱ्या अर्थाने जन्मतो;
समतेच्या प्रत्येक पावलावर,
भारत नव्याने उभा राहतो!

**- डॉ. बाळासाहेब लिहिणार**

## जीवनाच्या बदलल्या वाटा

सावधान चालतांना मित्रा
जीवनाच्या बदलल्या वाटा
विश्वासात घेऊन माणसे
आता काढत आहेत काटा. १

कोण आपले कोण परके
आता कळत नाही काही
संकटात जिवलग मित्र
शत्रू सोबत गंमत पाही. २

काळ शिकवितो माणसांना
क्षणोक्षणी बदलत रहा
जीवनात जगतांना आज
स्वतः कामात आनंद पहा. ३

तंत्रज्ञान युगात माणसा
खोटं बोलून हसवतात.
बदलत्या काळात लोकं
गोड बोलून फसवतात. ४

**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## स्वर्गीय अजित दादा पवार यांची जयंती साजरी



**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** जे ई एस महाविद्यालय जालना येथे महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी जे ई एस पतसंस्थेचे माजी अध्यक्ष श्री शामराव मामा राठोड, श्री शकुरदादा तडवी, श्री अशोकजी झीने, श्री राजेशजी इंगोटे, श्री सचिनजी जाधव, जेईएस पतसंस्थेचे संचालक श्री .दत्ताजी घोडके, श्री. राजेशजी दौड, श्री.अर्जुनभाऊ सोनटक्के तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे.आदी उपस्थित होते.

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २३ जुलै २०२६


## माहेश्वरी सभेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी जिंतूर येथील ब्रिजगोपाल तोष्णीवाल यांची निवड



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर महेश्वरी सभेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पदी ब्रिजगोपाल तोष्णीवाल यांची निवड झाल्या बद्दल जिंतूर येथे सत्कार करण्यात आला. त्यावेळी नगराध्यक्ष प्रताप देशमुख, व्हाईस ऑफ मीडियाचे कार्यध्यक्ष विजय चोरडिया, तालुकाध्यक्ष सचिन रायपत्रीवार, प्रेस क्लब अध्यक्ष मंचकराव देशमुख, तर प्रमुख पाहुणे प्राचार्य श्रीधर भोंबे, जि प सदस्य राजेंद्र थिटे, सचिन देवकर, व्यापारी किरण वट्टमवार, प्रा पांडुरंग निळे, पत्रकार आनंद मुरक्या, संदीप माहूरकर, दिलीप देवकर संतोष लहाने, आदी प्रतिष्ठित व्यापारी उपस्थित होते.

## श्रीकृष्ण महाविद्यालयात अजित पवार यांची जयंती साजरी



**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) :** येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांची जयंती साजरी करण्यात आली. नुकत्याच प्राप्त झालेल्या शासनाच्या परिपत्रकानुसार मा. अजितदादा पवार यांची जयंती साजरी करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड, त्याचबरोबर व्यासपीठावर प्रा. डॉ. महादेव खोत , श्री. दुर्योधन जमादार उपस्थित होते. सुरुवातीला अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यानंतर प्रा. डॉ. आर. एन. निगडे यांनी अजितदादा पवार यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू उलगडून दाखविताना त्यांच्या राजकीय जीवनावर चौफेर भाष्य केले. त्याची लोकाभिमुखता, लोकप्रियता , प्रशासनावर असलेले पकड आणि सर्वसामान्य माणसांची तातडीने काम करण्याची ऊर्जा वाखाणण्याजोगी होती असे सांगून राजकीय सारीपाटावर अशा व्यक्ती अत्यंत दुर्मिळ असतात असे सांगितले. त्यांचे असे अचानक आणि आकस्मित झालेले निधन मनाला चटका लावणारे होते.यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103


## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात दोन दिवसीय 'नेतृत्व विकास शिबिर' उत्साहात संपन्न





**जालना :** येथील बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात एम. आर. पै फाऊंडेशन (मुंबई) आणि फोरम ऑफ फ्री एंटरप्राइज (मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय नेतृत्व विकास शिबिराचा आज (२२ जुलै) मोठ्या उत्साहात समारोप झाला. २१ व २२ जुलै २०२६ दरम्यान पार पडलेल्या या शिबिरात विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, व्यक्तिमत्त्व विकास, संवादकौशल्य आणि निर्णयक्षमता वृद्धिंगत करण्यावर विशेष भर देण्यात आला.प्रत्यक्ष कृती आणि प्रात्यक्षिकांवर भरदोन दिवसांच्या या कार्यशाळेत प्रशिक्षक श्री. सचिन कामत व श्री. सुधीर पै (मुंबई) यांनी विविध सत्रांमधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. निर्णयक्षमता, समस्या निवारण, दैनंदिन सवयींमधून व्यक्तिमत्त्व विकास, प्रभावी संघकार्य कौशल्ये आणि अर्थपूर्ण नातेसंबंध निर्माण करणे यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी प्रात्यक्षिके, प्रत्यक्ष उदाहरणे आणि संवादात्मक उपक्रमांच्या माध्यमातून प्रकाश टाकला. दोन्ही प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे विशेष कौतुक केले.शिबिराच्या समारोप प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव व भावना व्यक्त केल्या. 'नेतृत्व म्हणजे केवळ इतरांना आदेश देणे नसून स्वतःला घडवणे होय' ही संकल्पना या शिबिरामुळे स्पष्ट झाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. ध्येयनिश्चिती, आत्मविश्वास, सहानुभूती, करिअर नियोजन, ऐकण्याची कला, चुकांमधून शिकण्याची वृत्ती तसेच 'स्वप्न आणि ध्येय' यांतील फरक या विषयांवरील मार्गदर्शनामुळे आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक व्यापक झाल्याचे मत आनंद पांचाळ, पल्लवी धनगर, नम्रता ठाकूर, अमृता जाधव, साहिया तांबोळी, अनिरुद्ध निकम आणि अथर्व मोहिते या विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सहभागी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार प्रा. संदीप पाटील यांनी मानले.हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. निलेश बर्डे, डॉ. रवींद्र शिंपी, डॉ. रवींद्र भोरे, डॉ. रामेश्वर मस्के, श्री. सुंदर वायाळ, श्री. अनिल जाधव, श्री. सतीश सोनवणे आदींनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हे शिबिर अत्यंत यशस्वी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)

विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २३ जुलै २०२६


## जिल्हा परिषद शाळेत लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला



***छायाचित्र** - लेखक अय्युब पठाण लोहगावकर हे विद्यार्थ्यांना व शिक्षकांना "कौतुकाची थाप" या पाठाचे विश्लेषण करताना दिसत आहे.*

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** : महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री लोकनेते स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्ताने पाठ्यपुस्तकातील ".कौतुकाची थाप " इयत्ता चौथी या पाठाचे लेखक अय्युब पठाण लोहगावकर हे प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या भेटीला जिल्हा परिषद शाळेत गेले होते. जिल्हा परिषद केंद्रीय शाळा ओहर आणि जि. प. शाळा रहाटपट्टी तांडा ता.जि. छत्रपती संभाजीनगर या शाळेत पाठ्यपुस्तकातील प्रत्यक्ष लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातील " कौतुकाची थाप " इयत्ता चौथी या पाठाचे लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी त्यांच्या पाठावर विद्यार्थी आणि शिक्षकांसोबत दिलखुलासपणे चर्चा केली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. लेखकाला पाहून शाळेतील विद्यार्थी भारावून गेले होते. तसेच जि.प.शाळा रहाटपट्टी तांडा येथील विद्यार्थ्यांना श्री पठाण यांच्या हस्ते जयंती निमित्ताने शालेय साहित्य वाटप करण्यात आले याप्रसंगी केंद्रप्रमुख बळीराम सूर्यवंशी, केंद्रीय मुख्याध्यापक एकनाथ जाधव, मुख्याध्यापक किरण आंबेकर, कार्यक्रमाचे संयोजक कवी मनोज खुटेसर ( जिल्हा अध्यक्ष राष्ट्रवादी शिक्षक संघ प्राथमिक छत्रपती संभाजीनगर ) शेख मोहसीनसर, श्रीमती धनावत मॅडम, तरटे मॅडम, सपकाळ मॅडम, रूबानीखान मॅडम, फरहात रामपुरे मॅडम, सो.आशा सोनवणे व महेताब भाभी, आणि गावातील पालक वर्ग विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जंयती साजरी



**पाटोदा (प्रतिनिधी)** : पाटोदा येथिल जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांची जंयती साजरी करण्यात आली.प्रारंभी महाविद्यालयात प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे व प्रमुख पाहुणे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम व मान्यवरांच्या शुभहस्ते स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर सामुहिक अभिवादन करण्यात आले. स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जंयती निमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजिवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई येथे आ.विजयसिंह पंडित यांच्या संकल्पनेतुन "जनसेवा सप्ताह " मध्ये शारदा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या भव्य रक्तदान शिबीरात प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थ्यांनी रक्तदान करून माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांना अभिवादन करण्यात आले. या रक्तदान शिबीरास शारदा स्पोर्ट कल्ब चे कार्यवाह युवा नेते रणवीरकाका पंडित,श्री.अमृत डावकर, प्रशासकीय अधिकारी श्री. प्रमोद गोरकर,प्रा. काशीनाथ गोगुले आदिनी भेट देवुन महाविद्यालयाच्या या रक्तदान शिबीराचे कौतुक केले.या शिबीरात रक्तदान केलेल्या रक्तदात्याना युवा नेते रणवीरकाका पंडित यांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र देण्यात आली.हे रक्तदान यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी नाटककार प्रा. बापू घोक्षे,प्रा.डॉ. बंडू लोखंडे, अजिवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या समन्वयक प्रा.डॉ.कल्पना घारगे आदिनी अथक परिश्रम घेतले या प्रसंगी प्रा.डॉ.सुनिल जाधव,प्रा.गोपाळ धांडे ,प्रा. सोमनाथ घाडगे, प्रा.विनोद किर्दक, प्रा.डॉ.प्रविण शिलेदार, प्रा. जाहेद सिद्दिकी,ग्रंथपाल प्रा.ज्योती रकटे,अनिल जाधव,नामदेव पोटफाडे,दिपक जावळे ,श्रीमती साळूबाई नाईकनवरे व वरिष्ठ व कनिष्ठ विभागाचे सर्व प्राध्यापक वृंद आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903


## बाल रुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच आर्थिक सहाय्य

**मुंबई, (बीड -भगवंत पाळवदे)** : मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी अंतर्गत बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच स्वतंत्र आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. महागड्या निदान चाचण्यांमुळे उपचार प्रक्रियेत होणारा विलंब टाळून कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे, यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे. या विशेष उपक्रमांतर्गत राज्यातील २०० आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्करोगग्रस्त बालरुग्णांना निदानासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय चाचण्यांसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.या लाभाअंतर्गत ० ते १८ वयोगटातील पात्र बालरुग्णांना कर्करोगाचे निदान निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक तसेच पुढील खर्चिक वैद्यकीय चाचण्यांसाठी आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. या सहाय्यामुळे आर्थिक अडचणींमुळे निदान प्रक्रियेत होणारा विलंब टाळून वेळेत निदान आणि उपचाराचे प्रभावी नियोजन करणे शक्य होणार आहे.पहिल्या दोन महिन्यांतच ५९ बालरुग्णांना ५० लाख रूपयांचे आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात आले आहे. या सर्व बालरुग्णांचे कर्करोग निदान टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे करण्यात आले. बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच सुरू करण्यात आलेला हा उपक्रम आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी महत्त्वाचा आधार ठरत आहे. वेळेत निदान झाल्यामुळे उपचाराला होणारा विलंब कमी होऊन बालरुग्णांना योग्य वेळी उपचार सुरू करण्यास मदत होत आहे.मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी अंतर्गत बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच स्वतंत्र आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. हा लाभ राज्यातील २०० आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्करोगग्रस्त बालरुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या २०० लाभार्थ्यांपैकी आतापर्यंत ५९ बालरुग्णांना निदानासाठी आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. गरजू रूग्णांनी अधिक माहितीसाठी टोल फ्री क्रमांक १८००१२३२२११ वर संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २३ जुलै २०२६

# विद्यार्थी आंदोलन : लोकशाहीचे संकट की विद्यापीठीय संस्कृतीचे प्रतीक ?

## लोकशाही, विद्यापीठे आणि राष्ट्रनिर्मितीचा ऐतिहासिक अन्वयार्थ




विद्यार्थी आंदोलन घडले की त्याचा संबंध अनेकदा अराजकता, शिस्तभंग आणि राजकारणाशी जोडला जातो. परंतु इतिहास वेगळीच साक्ष देतो. लोकशाहीच्या प्रवासात विद्यार्थी आंदोलने ही संकटाची नव्हे, तर सशक्त विद्यापीठीय संस्कृतीची आणि जागृत समाजाची चिन्हे राहिली आहेत. म्हणूनच विद्यार्थी आंदोलनांचा विचार केवळ कायदा-सुव्यवस्थेच्या चौकटीत न करता विद्यापीठांच्या ऐतिहासिक भूमिकेच्या संदर्भात करणे आवश्यक ठरते. कोणत्याही राष्ट्राची खरी ताकद केवळ अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान किंवा लष्करी सामर्थ्यात नसते ती त्याच्या विचारशक्तीत असते. ही विचारशक्ती घडविण्याचे कार्य विद्यापीठे करतात. म्हणूनच विद्यापीठांचा प्रश्न हा केवळ शिक्षणाचा नसून लोकशाही, सामाजिक परिवर्तन आणि राष्ट्रनिर्मितीचा प्रश्न आहे. विद्यापीठे : ज्ञानसंस्था की राष्ट्रनिर्मितीची केंद्रे? प्राचीन भारतातील तक्षशिला आणि नालंदा ही केवळ शिक्षणसंस्था नव्हती; ती जागतिक ज्ञानकेंद्रे होती. तेथे विषयांचे अध्यापनच नव्हे, तर मुक्त चर्चा, वादसंवाद, संशोधन आणि सत्यशोधनाची परंपरा जोपासली जात होती. ज्ञानाचा उद्देश केवळ पदवी नव्हता; तर विवेक, बौद्धिक प्रामाणिकपणा आणि समाजहिताची जाणीव विकसित करणे हा होता. हीच परंपरा जगाच्या इतर भागांतही दिसून येते. प्राचीन ग्रीसमधील प्लेटोची 'अकॅडमी', मध्ययुगीन बगदादमधील 'ज्ञानगृह' (हाऊस ऑफ विज्डम) आणि पुढे युरोपमधील बोलोनिया विद्यापीठ या सर्व ज्ञानसंस्थांनी एक समान मूल्य जपले आज्ञाधारक अनुयायी नव्हे, तर स्वतंत्र विचार करणारे नागरिक घडविण्याचे. 19 व्या शतकात जर्मन शिक्षणतज्ज्ञ विल्हेल्म फॉन हंबोल्ट यांनी आधुनिक विद्यापीठाची संकल्पना मांडताना संशोधन, अध्यापन आणि बौद्धिक स्वातंत्र्य या तीन तत्त्वांना केंद्रस्थानी ठेवले. त्यांच्या मते विद्यापीठाची गुणवत्ता त्याच्या इमारतींमध्ये नसून तेथे निर्माण होणाऱ्या विचारांमध्ये आणि संशोधनात असते.भारतात आधुनिक विद्यापीठ व्यवस्थेची पायाभरणी 1857 मध्ये कलकत्ता, मुंबई आणि मद्रास विद्यापीठांच्या स्थापनेने झाली. पुढे या विद्यापीठांनी केवळ सुशिक्षित मनुष्यबळ निर्माण केले नाही, तर भारतीय राष्ट्रवाद, सामाजिक सुधारणा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनालाही दिशा दिली. म्हणूनच विद्यापीठे समाजाचे केवळ प्रतिबिंब नसतात; ती समाजाची दिशा ठरविणारी केंद्रे असतात. विद्यार्थी आंदोलनांचा इतिहास काय सांगतो ? विद्यार्थी आंदोलन ही आधुनिक काळातील घटना नाही. प्रत्येक युगात सामाजिक परिवर्तनाची चाहूल सर्वप्रथम विद्यापीठांमध्ये लागलेली दिसते. याचे सर्वात प्रभावी उदाहरण म्हणजे चीनमधील 1919 सालची 'मे फोर्थ' चळवळ. या चळवळीचा जन्म रस्त्यावर नव्हे, तर पेकिंग विद्यापीठातील वर्गखोल्यांमध्ये झाला. काई युआनपेई, चेन दुश्यू, ली दाझाओ आणि हू शिह यांसारख्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रम शिकवला नाही; तर वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार आणि राष्ट्रीय उत्तरदायित्वाची जाणीव दिली. त्यामुळे हे आंदोलन भावनिक उद्रेक नव्हते; तर दीर्घकालीन बौद्धिक प्रक्रियेचे फलित होते. इतिहासाचा निष्कर्ष स्पष्ट आहे. कोणतेही विद्यार्थी आंदोलन अचानक घडत नाही. त्यामागे अध्ययन, संशोधन, सामाजिक वास्तवाचे आकलन आणि प्रश्न विचारण्याची बौद्धिक तयारी असते. ज्या विद्यापीठांत विचारांची देवाणघेवाण थांबते, तेथे बौद्धिक स्थिरता निर्माण होते आणि ती कोणत्याही समाजासाठी घातक ठरते. भारतीय इतिहासातही हेच चित्र दिसते. 1905 च्या स्वदेशी आंदोलनापासून असहकार, भारत छोडो आंदोलन, हैदराबाद मुक्तिसंग्राम, गोवा मुक्ती आंदोलन आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीपर्यंत विद्यार्थ्यांनी प्रत्येक निर्णायक टप्प्यावर सक्रिय भूमिका बजावली. ते केवळ आंदोलनात सहभागी नव्हते; तर राष्ट्रीय जाणीवा जागृत करणारे सामाजिक घटक होते. त्यामुळे विद्यार्थी चळवळींचा इतिहास हा भारतीय लोकशाहीच्या परिपक्वतेचाही इतिहास आहे. इतिहासाचा स्पष्ट निष्कर्ष असा आहे की विद्यार्थी आंदोलन हे लोकशाहीचे संकट नसून, सशक्त विद्यापीठीय संस्कृतीचे ऐतिहासिक उत्पादन आहे. इतिहास केवळ भूतकाळ समजावून सांगत नाही तो वर्तमानाचे मूल्यमापन करण्याची दृष्टीही देतो. त्यामुळे आजच्या भारतीय विद्यापीठांच्या स्थितीकडेही याच ऐतिहासिक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. आजची विद्यापीठे : विस्तार की गुणवत्ता? इतिहास समजून घेतल्यानंतर आजच्या भारतीय विद्यापीठांची स्थिती बघणे आवश्यक ठरते. कोणत्याही विद्यापीठाची गुणवत्ता त्याच्या इमारती, विद्यार्थीसंख्या किंवा पदवी वितरणावर ठरत नाही ती तेथील विचारप्रक्रिया, संशोधनाचा दर्जा आणि सामाजिक उत्तरदायित्वावर अवलंबून असते. भारत आज जगातील सर्वात मोठ्या उच्च शिक्षण व्यवस्थांपैकी एक आहे; मात्र या विस्तारासोबत काही गंभीर प्रश्नही उभे राहिले आहेत. परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी, पेपरफुटी, शिक्षणाचे व्यापारीकरण, संशोधनासाठी अपुरा निधी, गुणवत्तेतील विषमता, कौशल्य आणि रोजगारातील दरी, विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण तसेच विद्यापीठांच्या स्वायत्ततेबाबतचे प्रश्न ही केवळ प्रशासकीय अडचणी नाहीत; ती भारताच्या बौद्धिक भवितव्याशी निगडित आव्हाने आहेत. ज्ञानकेंद्रे जर केवळ प्रमाणपत्रे देणाऱ्या संस्थांमध्ये रूपांतरित झाली, तर लोकशाहीचा वैचारिक पाया कमकुवत होऊ लागतो. या आव्हानांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग ही नवी भर पडली आहे. आज माहिती एका क्षणात उपलब्ध होते; परंतु माहिती म्हणजे ज्ञान नव्हे. माहिती ही तथ्यांची मांडणी असते, तर ज्ञान म्हणजे त्या तथ्यांचे चिकित्सक विश्लेषण करून सत्याचा शोध घेण्याची क्षमता. कृत्रिम बुद्धिमत्ता माहिती निर्माण करू शकते परंतु नैतिक विवेक, सामाजिक संवेदनशीलता आणि लोकशाही मूल्यांबद्दलची बांधिलकी घडवू शकत नाही. त्यामुळे तंत्रज्ञान जितके विकसित होईल, तितकी विद्यापीठांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरेल. युनेस्कोने उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट स्पष्ट करताना विद्यापीठे ही केवळ कौशल्यनिर्मितीची केंद्रे नसून लोकशाही, सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि जागतिक नागरिकत्व घडविणाऱ्या संस्था असल्याचे अधोरेखित केले आहे. भारतीय राज्यघटनेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आणि वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद व चिकित्सक वृत्ती जोपासण्याची मूलभूत कर्तव्येही याच मूल्यांना बळ देतात. त्यामुळे विद्यापीठांची जबाबदारी केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरती मर्यादित राहत नाही ती संविधानिक लोकशाहीचे बौद्धिक रक्षण करण्यापर्यंत विस्तारते. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थी आंदोलनांकडे पाहण्याची दृष्टी संतुलित असली पाहिजे. कोणत्याही लोकशाहीत हिंसा, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस किंवा कायद्याचे उल्लंघन स्वीकारार्ह असू शकत नाही. परंतु याचा अर्थ प्रत्येक विद्यार्थी आंदोलन लोकशाहीविरोधी असते, असा होत नाही. शांततापूर्ण आंदोलन, विवेकाधिष्ठित असहमती, सार्वजनिक धोरणांवर चिकित्सक प्रश्न उपस्थित करणे आणि शासनाला उत्तरदायी धरणे ही लोकशाहीचीच लक्षणे आहेत. म्हणून प्रश्न विचारणारे विद्यार्थी लोकशाहीसाठी धोका नसतात; प्रश्न विचारण्याची क्षमता हरवलेली विद्यापीठे मात्र निश्चितच धोकादायक ठरतात.

शिक्षक : विद्यापीठीय संस्कृतीचा केंद्रबिंदू या संपूर्ण प्रक्रियेचा केंद्रबिंदू म्हणजे शिक्षक. तो केवळ ज्ञानदाता नसून विवेकशील, उत्तरदायी आणि संविधाननिष्ठ नागरिक घडविणारा समाजाचा शिल्पकार असतो. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याचे धैर्य देणे, पुराव्यावर आधारित विचार करण्याची सवय लावणे, मतभिन्नतेचा आदर शिकविणे आणि सत्यशोधनाची वृत्ती विकसित करणे ही त्याची मूलभूत जबाबदारी आहे. जिथे वर्गखोल्यांत प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य असते, तिथे लोकशाहीही अधिक सुदृढ राहते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी विद्यापीठांना राष्ट्राच्या "बौद्धिक विवेकाची केंद्रे" म्हटले होते. डॉ. आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले, तर महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणातून समतेची क्रांती घडवून आणली. या सर्व विचारांचा समान धागा एकच आहे शिक्षणाचे अंतिम ध्येय केवळ रोजगार नव्हे, तर विवेकशील, समतावादी आणि लोकशाहीवादी समाजाची निर्मिती. आज भारतासमोरचा मूलभूत प्रश्न असा आहे की, आपल्याला केवळ पदवीधरांची संख्या वाढविणारी विद्यापीठे हवी आहेत की विचार करणारे, संशोधन करणारे, सामाजिक भान असलेले आणि संविधानिक मूल्यांशी निष्ठावान नागरिक घडविणारी विद्यापीठे? या प्रश्नाचे उत्तरच भारताच्या लोकशाहीचे भवितव्य ठरवेल. इतिहास पुन्हा पुन्हा एकच धडा शिकवतो ज्या समाजात विद्यापीठे प्रश्न विचारणे थांबवतात, तेथे लोकशाही हळूहळू दुर्बल होते आणि जिथे मुक्त विचार, चिकित्सक संशोधन व विवेकपूर्ण संवादाची परंपरा जिवंत राहते, तेथे राष्ट्र केवळ आर्थिक नव्हे, तर बौद्धिक आणि नैतिकदृष्ट्याही समृद्ध होते. म्हणून विद्यार्थी आंदोलनांचा प्रश्न हा केवळ शिस्तीचा किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नाही तो विद्यापीठीय संस्कृतीच्या दर्जाचा प्रश्न आहे. विद्यापीठांचे खरे कार्य पदव्या प्रदान करणे नाही, तर प्रश्न विचारणारे, पुराव्यांच्या आधारे विचार करणारे, मतभिन्नतेचा आदर करणारे आणि सार्वजनिक जीवनात जबाबदारीने सहभागी होणारे नागरिक घडविणे हे आहे. कारण राष्ट्राची खरी ओळख त्याच्या सीमांनी, संपत्तीने किंवा उंच इमारतींनी नव्हे, तर विद्यापीठांत जपल्या जाणाऱ्या विचारस्वातंत्र्याने, संशोधनाच्या गुणवत्तेने आणि तेथून घडणाऱ्या जागरूक नागरिकांनी निश्चित होत असते.म्हणून विद्यार्थी आंदोलन हे लोकशाहीचे संकट नसून, सशक्त, स्वायत्त आणि विचारप्रधान विद्यापीठीय संस्कृतीचे प्रतीक आहे. अशा विद्यापीठांवरच लोकशाहीचा वर्तमान टिकतो आणि राष्ट्राचा भविष्यकाळ उभा राहतो.




**- शेख इरफान अय्युब**
(सहा.प्राध्यापक इतिहास विभाग)
डॉ. रफिक झकेरिया कॉलेज फॉर वुमेन
छत्रपती संभाजीनगर,४३१००१
ईमेल- iasirfan82@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २३ जुलै २०२६


## हे वयच असं असतं : तरुणाईचा अंतरिक वेदनेचा हुंकार




कवीवर्य व एक साक्षेपी कांदबरीकार. संजय जाधव शालेय ते महाविद्यालयीन जगण्यातील एक सृजनशील मनोभूमिकेत अस्सल सल मांडत ही कांदबरी म्हणजे एका युवकांची प्रेमाच्या आठवांची दास्तान.राष्ट्रगीताने सुरु झालेली कांदबरी एक दर्दभरी कैफियत म्हणजे अतिशय नितळ निर्लेप निस्पृह श्रद्धेय भावनेतून वंदूवर केलेलं प्रेम.या प्रेमासाठी जीवाची बाजी लावून रेल्वे भरती परीक्षेची केलेली अभ्यासाची तयारी. परीक्षा पेपरचा पुढे परीक्षेत घोटाळा झाला म्हणून पेपर रद्द.इथे स्वत: निवेदक रविंद्र व वंदना यांच्या प्रेमाचा विरह यात आला आहे.तिचे लग्न झाले आणि दोन महिन्यांत रेल्वे परीक्षा पास झाले.म्हणून "इंटरव्ह्यूला जाऊन आलो आणि मार्च मध्ये मला आर्डरपण आली.हीच आर्डर दोन महिने अगोदर आली असती तर?साला नशीब गांडू तो क्या करेगा पांडू" (पृ.164)या कांदबरीत सच्चा यारी-दोस्तीचे अनेक भावस्पर्शी प्रसंग या कांदबरीत आहेत.एकून आठरा प्रकरणांमध्ये ही कांदबरी आपले मित्र यार, दोस्त यांच्या जगण्याच्या फक्कड कथा आहेत.1968-1969चा यांच्या तरुणाईचा काळ.या काळात घरांच्यांनी शिक्षणासाठी जे प्रोत्साहन दिले ते अत्यंत गौरवास्पद आहे.बाप कमी शिकलेले पण मुलं शिकली पाहिजे म्हणून त्यांना तत्काळात वाटेल ती पैशाची मदत केली.कारण शिक्षण हे अतिशय पवित्र होते.त्यात कुठलीही गढुळपणा नव्हता.अभ्यास हाच ध्यास असेल तर यशस्वी होणारी ती पिढी होती.जी मुलं शिकली ती नोकरी मिळवूनच राहिली.त्यावेळी कॉमर्स फॅकल्टीला अतिशय महत्त्व होते म्हणजे रेल्वे व नॅशनल बँक खात्यात परीक्षा पास झाले की नोकरी होती.आपल्या गावातील विद्यालय त्या विद्यालयातील मुख्याध्यापक त्यांची प्रचंड कडक शिस्त.ही कांदबरी त्यातील नायक इतक्या सहजपणे गुण अवगुणा विषयी प्रखर भाष्य करतो.आजचे तरुण पिढी ही निर्वाढलेली आहे.त्याकाळातील मित्र ही वडीलधाऱ्यांचा मान ठेवत होती.पण खाजगीत मित्र मंडळी बिनधास्त बोलत होती.त्या बोलण्यात एक शिवराळ भाष्या होती ती सहज आलेली.प्रकरण पाच मध्ये.देवपुर धुळे येथे आपल्या बहिणीच्या लग्नाला नवरदेव सोबत बडोद्याहुन आलेली पंध सोळा वर्षाची नवयुती.रव्याची मित्र मंडळी त्यांना टांग्यात घेऊन येतात.घरी येतात.इथून ही हळूवार स्पर्श प्रेमाची कहाणी सुरू होते.ती गुजराती भाषेत बोलते.तमे आलो नछी 'तमारु नाम शुंग छे'. रविंद्र.कुणीतरी तिला वंदना म्हणालं.एका गच्चीतला प्रसंग.तिला तो आवडू लागला.बहिणीचं लग्न झालं.वाट लावलं.बडोद्याला ये!असा आग्रह.पुढे तो दिवाळीच्या सुट्टीत बडोद्याला बहिणीकडे जातो.त्यावेळेसवंदनाने रविंद्रला सायकलवर बडोदा फिरविले.अतिशय मनसोक्त आनंद घेतला.वंदनाच्या आईही अतिशय मुक्त व्यक्त होण्यासाठी त्यांना मुभा दिलो.त्याला जेवणाचे निमंत्रण दिले.वंदनाला रविंद्र आवडू लागला. सुट्टीचे दिवस संपले तो देवपूरला येतो ते वंदनाच्या निस्सीम प्रेमाची अनुभूती घेऊनच.लग्न करायचं तर हिच्याशीच.हा मनाने केलेला निश्चय.तो कस्सून अभ्यासला लागतो.कॉलेजची परीक्षा पास व्हायचे नोकरी शोधायची.मग लग्न करायचे.जसे आज तसे कालाही होते.या कांदबरीत सच्चा लेखानांचा आणि चिंतनाचा विषय आशय संपन्न सृजन समर्पक आहे जसे "या जगात जे जे काही निर्माण होतं त्याचा उपयोग घेतला पाहिजे.नाहीतर निर्मिती फुकाची ठरते"रव्या जास्त विचार करू नको'(पृ.99) ही सविनय भावना आहे.1)नशीबाला एकदा तुमचं मुस्काट फोडायची संधी मिळाली की,ते जमेल तसं आपल्याला फटकारत राहत' 'सोबत वंदुची लग्न पत्रिका.ती लग्नपत्रिका धगधगत्या विस्तवासारखी मला दिसू लागली.त्या विस्तवाखाली माझं काळंठिक्कर झालेलं प्रेम! शेवटी प्रेम आणि व्यवहार यात व्यवहार जिंकला.'(पृ.162)ही सखेद प्रेमाची अनुभूती देणारी ही धगधगती कांदबरी आहे.'पुन्हा हे वयच असं असतं' माणूस म्हणून गपगुमान प्रारब्धाशी जुळून घ्यावं लागतं.इथे लेखक अंत:करणापासून मनाची समजूत घालतो.आणि लिहितो "लग्न पत्रिकेसोबत तिची प्रेमळ चिठ्ठी होती.लग्नाला तू आलाच पाहिजे!अशी!मला स्वत:वर हसावं की रडावं कळतं नव्हतं.वंदूचं लग्न बडोद्याला पंधरा दिवसांनी.चित्रपटाच्या रिळ सारखे वंदू सोबतचे एकेक प्रसंग सरकू लागले.मग खरं काय होतं?जे समोर होतं तेच खरं होतं.आणि तेच स्विकारणं भाग होतं.(पृ.163)असे सृजन विचार म्हणजे लेखकाच्या सद्सद्विवेक विचारांच्या भावना तळमनाचा ठाव घेते कारण ही कांदबरी एक दर्दभरी कैफियत तर मांडतेच पण एक वास्तवाचा विचार देऊन जाते.सत्कर्म कधीचं वाया जात नाही.या भावबंधानात कुठलेही गैरवर्तन नायकांने केले नाही.आजच्या समकालीनामध्ये हे विकृत वर्तन पाह्येला मिळते.या कादंबरीला डॉ मिलिंद मधुकर दुसाने यांची अत्यंत अभ्यासपूर्ण चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक प्रस्तावना लिहिली आहे ती अशी "आजच्या पिढीला जितकी मोकळीक तितके ब्रेकअप जास्त.तुलनेने या पिढीतील प्रेमवीर सच्चे म्हणावे असेच.सच्चा यारी- दोस्तीचे अनेक भावस्पर्शी प्रसंग ह्या कांदबरीत आहेत,तर सामाजिक भीषणताही तितक्याच दहाकतेने समोर येते.प्रवीणच्या बहिणीचा सासरी झालेला खून, तरीही हा अन्याय मुकाट सहन करुन गप्प बसणारे प्रवीणचे आई वडील.रावस्याची बिनधास्तगिरी, आणि तितकाच करुण अंत.सलीमची एक वेगळीच दुनिया.प्रविणचे हलक्या जातीच्या समाजातील मुलीवर असणारे प्रेम.त्यातही जातीव्यवस्थेच्या भितीपोटी घ्यावी लागलेली माघार, स्वत: निवेदक रविंद्रचे वंदनाबरोबर जुळलेले भावबंध,हे सुध्दा व्यावहारीक सोयरीकीमुळे कोमेजले जातात"(पृ.05)हीकांदबरी म्हणजे आत्मिक भावबंध मुक्त व्यक्त करताना जी सल आहे ती अस्सल ठणक देऊन जाते.इथे लेखक म्हणून त्यांच्या वैचारिक वैभवाची एक निस्सीम अभ्यासक वृत्ती आणि सभोवतालच्या घटांकाविषयीची सुक्ष्म चिंतनदिसून येते.कादंबरीतील स्वभाव वैशिष्टे बारकावे यांचेही मर्मग्राही भाषीक अभिव्यक्तीने ते ठळकपणे जाणवते.ख्यातनाम लेखक कवी,संपादक, प्रकाशक काशिनाथ भारंबे 'निर्मोही'यांची पाठराखण अशी"कादंबरीची बाजू अशी की,मनाने सालस परंतू वाह्यात वाटणाऱ्या तरूण मुलांच्या वागणूकीने त्रस्त असलेले त्यांचे पालक त्यांना कंटाळले असले तरी संयमित मनाने यातना सहन करत कुटुंबाची प्रतिमा डागळणार नाही याची खबरदारी घेत कसातरी संसार रेटत असतात.आणि मानानं जगावं हेही शिकवता असतात"(पाठराखण) मानवीमूल्येचे अधिष्ठान ही प्राप्त करणारी ही कांदबरी आहे.कवी संजय जाधव आपल्या अर्पण पत्रिकेत लिहितात "ज्यांनी माझ्यावर प्रेम केलं त्यांना! आणि ज्यांनी माझ्यावर प्रेम करण्याचं नाटक केलं त्यांना सुध्दा!!(पृ.03)अशा मनोज्ञ भावदर्शन या कादंबरीने दिले आहे.हे वयचं असं असतं.ते कसं असतं म्हणून ही कांदबरी वाचलीच पाहिजे!

**पुस्तक:-'हे वयचं असं असतं...लेखक:-संजय शंकर जाधव,प्रकाशन:-मैफल प्रकाशन, भुसावळ प्रथमवृती:-४/४/२०२५मुखपृष्ठ:-प्रेम राजेश सोनार (बदलापूर)मूल्य रूपये २५०/परिचय**



**परिक्षण:- डॉ प्रभाकर शेळके जालना**

## स्व.अजित दादांना कालिकादेवी विद्यालयात अभिवादन



**शिरूर, कासार (प्रतिनिधी) :** कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये,'महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व.अजित दादा पवार साहेब'यांची जयंती साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते स्व.अजित दादा पवार साहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी आपल्या मनोगतातून,'सांगितले की,अजित दादांचे विचार हे परिवर्तनवादी व विकासाभिमुख होते.त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासाला जास्त महत्त्व दिले होते.त्याचबरोबर त्यांना शिक्षण,आरोग्य व शेती या क्षेत्रात मोठा बदल घडवून आणायचा होता.म्हणूनच त्यांनी शेती,पाणी,सिंचनाला जास्त महत्त्व दिले होते.त्यांच्या कामाचा आवाका फारच व्यापक होता.तसेच ते वेळेला फार महत्त्व देत होते.हे दादांच्या व्यक्तिमत्त्वातील महत्त्वाचे गुण आहेत.विद्यार्थ्यांनी हे गुण अंगीकारले पाहिजे.असे आपल्या मनोगतातून सांगितले.याप्रसंगी विद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,उपमुख्याध्यापक सिद्धेश्वर शिंदे,पर्यवेक्षक जनार्धन काळे, प्रा.संजय काकडे,प्रा.महारुद्र डोंगरे, प्रा.नामदेव तरकसे,विशेष निमंत्रित मा.विश्वासराव नागरगोजे (तालुकाध्यक्ष-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,शिरूर का.)मा.रवी आघाव (जिल्हा सरचिटणीस-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)मा.अक्षय जाधव(युवा तालुकाध्यक्ष-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,शिरूर का.)मा.धर्मा जायभाये,मा.सुनिल गाडेकर,मा.सुभाष यमपुरे,मा.किशोर जेधे,मा.दादा सवासे मा.विठ्ठल जेधे तसेच विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते या सर्वांनी स्व.अजित दादा पवार साहेब यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून विनम्र अभिवादन केले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २३ जुलै २०२६

# उपवर्गीकरणाच्या निमित्ताने : एक कटूसत्य

उपवर्गीकरणाच्या निमित्ताने वेगवेगळ्या स्तरातून, जातींच्या गटातून वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चा, लेख, पोस्ट, विडिओ वॉट्सऐप वरून फिरत आहेत. उपवर्गीकरणाच्या विरोधात व समर्थनार्थ महामोर्चे-आक्रोश मोर्चे निघत आहेत. त्यातून डॉ. बाबासाहेबांचा द्वेष करणे, लहुजी साळवे, मुक्ता साळवे आणि अण्णाभाऊ साठे यांच्या बद्दलचे विविध गैरसमज समाजात पसरविले जात आहेत. बाबासाहेब आणि अण्णाभाऊ यांची अनावश्यक तुलना करणे असाही काहीसा प्रकार होताना दिसत आहे. अज्ञानी व जातीनिष्ठ लोकांमुळे, समाजात वेगवेगळे गैरसमज पसरविले जात आहेत. त्यामुळे प्रबुद्ध भारतीय नागरीकांनी वेळीच सावध होणे गरजेचे आहे.यानिमित्ताने विवेकनिष्ठ भूमिका पुढे येणे मला आवश्यक वाटले. म्हणून हा लेखन प्रपंच करावा लागला.मातंग आणि महार यांच्यामध्ये अनादिकाळापसून व्यक्तीद्वेष आहे. बाबासाहेबांनी अनेक महार-मांग परिषदा घेतल्या. दे.ना. कांबळे, पाथ्री (परभणी) यांनी पाठवलेल्या पत्रास उत्तर देऊन आपली सामाजिक, राजकीय व राष्ट्रीय भुमिका स्पष्ट केली. पण आज घडीला महार काय म्हणतो आणि मातंग काय म्हणतो याला कवडीचाही अर्थ राहिलेला नाही. कारण दोघांच्याही ठायी महापुरुषांचा आदर कुठेच दिसत नाही. हे दोघेही जातींचे प्रतिनिधीत्त्व करत आहेत. जे जातिनिष्ठ नागरिक आहेत, ते महापुरुषांचे कुणीही लागत नाहीत. त्यांनी महापुरुषांचा विचार स्वीकारलाच नाही. महार सुद्धा बाबासाहेबांना फक्त मानतात. स्वीकारत नाहीत. अंगिकारत नाहीत. त्यांना कर्तव्यापेक्षा जातच श्रेष्ठ वाटते. देशातील इतर नागरीकांसारखेच तेही डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीचे फक्त लाभार्थी आहेत. ते त्यांच्या राष्ट्रीय विचारधारेवर चालत नाहीत. त्यांना त्याची गरजही वाटत नाही. कारण बाबासाहेब आपल्याच जातीचे आहेत, याचा त्यांना गर्व वाटतो.याला काही अपवादही आहेत. पण बाबासाहेबांना व त्यांच्या राष्ट्रीय धोरणांना स्वीकारणारे या देशात पाच ते दहा टक्केच लोक आहेत. बाकीचे भारतीय नागरिक त्यांना फक्त लाभार्थी म्हणून मानतात. आणि ७० टक्के लोक त्यांना व त्यांच्या राष्ट्रीय भुमिकांना उघड-उघड विरोध करतात तर काहीजन द्वेषही करतात. याचा अर्थ ते राष्ट्रीय विचारधारेच्या विरुद्ध वागतात असाच होतो. जिथे जातीची अस्मिता तिव्र असते तिथे असे घडणे स्वाभाविक आहे. बाबासाहेबांच्या राष्ट्रीयत्त्वाचे, राष्ट्रोन्नतीच्या विचारधारेचे त्यांना कसलेच मोल वाटत नाही. देशभरात बाबासाहेबांच्या संविधानाचे लाभार्थी सर्वजनच आहेत. भारतीय लोकांची जातीवरच अधिक निष्ठा असल्यामुळे, विचारधारा स्वीकारण्यापुर्वी सुद्धा महापुरुषांची जात महत्त्वाची मानली जाते. हीच महापुरुषांच्या अनुयायांची आणि भारतीय नागरिकांची मानसिकता आहे. अण्णाभाऊ मांगांचे आहेत. लहुजी साळवे मांगाचे आहेत. मुक्ता साळवे मांगांच्या आहेत, म्हणून मांगांनी त्यांना देशात सर्वश्रेष्ठ मानायचे. आणि इतर जातींनी त्यांना स्विकारायचेच नाही. असा संकेतच दृढ झालेला आहे. हा निचांक गाठणारा दृष्टिकोण, जातीनिष्ठेतून येतो. विचारधारेतून, राष्ट्रीयत्वातून महापुरुषांचा विचार-भूमिका स्विकारल्या जात नाहीत. अण्णाभाऊंना एक दृष्टा साहित्यिक म्हणून स्वीकारणे योग्य आहे. बाबासाहेबांनी मानवमुक्तीची मुव्हमेंट उभी केली. सम्राट अशोकाच्या 'सुवर्ण भारता'नंतर पहिल्यांदाच 'लोकसत्ताक भारत' निर्माण केला. राष्ट्रनिर्माणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य सम्राट अशोका इतकेच मोठे आहे, नव्हे त्यापेक्षाही अधिक मोठे आहे. कारण अशोक हे सम्राट होते. सर्व प्रकारचे वैभव त्यांच्याकडे होते. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य समाजातून पुढे आलेले व्यक्ती होते. पुरेशी साधने, कसल्याही प्रकारच्या सुविधा नसताना व शिक्षण घेण्याचा अधिकार नसताना देखील, केवळ शिक्षण आणि बुद्धीच्या जोरावर त्यांनी 'लोकसत्ताक भारत' निर्माण केला. सर्व भारतीय नागरिकांना त्या दिशेने विचार करायला व वाटचाल करायला भाग पाडले. म्हणून त्यांचे कार्य सम्राट अशोका पेक्षाही मोठे मानले गेले पाहिजे. केवळ ब्रिटिशांच्या विरुद्ध लढला गेलेला स्वातंत्र्यलढाच देशाच्या इतिहासातील सर्वात मोठा स्वातंत्र्यलढा समजणे चुकीचे ठरेल. आणि ब्रिटिश हेच देशाच्या इतिहासातील सर्वात मोठे भारतीयांचे शत्रू होते, हे समजणे देखील चुकीचे ठरेल. कारण 'सुवर्णभारता'ची आजही जगभर ओळख आहे. असा तो 'सुवर्णभारत' उध्वस्त करणारे शत्रू कोण होते, ते पहिल्यांदा शोधता आले पाहिजे. राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या सक्षम असलेला 'सुवर्ण भारत' उद्ध्वस्त करणाऱ्यालाच, आपल्या भारताचा सर्वात मोठा शत्रू समजले गेले पाहिजे. इथली शिक्षण व्यवस्था ज्यांनी उध्वस्त केली, जागतिक स्तरावरचे विद्यापीठे ज्यांनी उध्वस्त केली, भारतातल्या लोकांनाच ज्यांनी गुलाम बनवले. मानसिक गुलामगिरीमध्ये टाकून, त्यांचे अव्याहत शोषण केले. विश्वगुरू असलेला भारत उद्ध्वस्त केला, जगाच्या शिक्षणाची व्यवस्था करणारा, जगाची प्रेरणा ठरलेला 'सुवर्णभारत' उद्ध्वस्त केला. ते ब्रिटिशांपेक्षाही क्रूर असलेले शत्रू नेमके कोण आहेत, याचा शोध घेणे मोठे जिकीरीचे काम आहे. इतिहासकारांनी याची नोंद घेणे अत्यावश्यक आहे. ब्रिटिश तर बाहेरुनच आले होते, परंतू सुवर्ण भारत उद्ध्वस्त करणारे भारतीय होते, की परकीय! हे राष्ट्रीयत्त्वाच्या भावनेने स्पष्ट झाले पाहिजे. 'सुवर्ण भारत' ही भारताची जागतिक ओळख आहे. असे असतांना ब्रिटिशांच्या विरुद्ध लढला गेलेला लढाच, देशाच्या इतिहासातील सर्वात मोठा 'स्वातंत्र्याचा लढा' होता असे का मानले जाते..? ऐतिहासिक सत्य तर हे आहे, की ब्रिटिशांविरुद्धचा लढा हा स्वातंत्र्याचा लढा होऊ शकत नाही. कारण १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री, देशातील प्रमुख जाती आणि धर्मांच्या पुढाऱ्याबरोबर फक्त राजकीय वाटाघाटी झाल्या होत्या. परंतु उद्ध्वस्त झालेल्या 'सुवर्ण भारताला' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, 'लोकसत्ताक भारतात' परावर्तित करुन सम्राट अशोकाचा 'लोकसत्ताक भारत' अस्तित्त्वात आणला. भारताची प्राचीन लोकशाही व्यवस्था चालविण्यासाठी भारतातील विद्वान लोकांच्या संमतीने, त्यांच्या अनुमतीने 'भारतीय संविधान' लिहिले. हे जगातले सर्वात मोठे राष्ट्रीयत्त्वाचे सामर्थ्य मानले पाहिजे. 'लोकसत्ताक भारत' निर्माण करणे हाच खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा लढा होता. ब्रिटिशांना या देशातून बाहेर घालवण्यासाठी जे जे क्रांती लढे झाले, कार्यवाही झाल्या. त्याचे मोल कमी नाही. हाही एक प्रकारचा स्वातंत्र्य लढाच होता, पण तो कृत्रिम होता. कारण ब्रिटिशांनी या देशाची सिंधू संस्कृती शोधून काढली. वेरूळ-अजिंठा शोधून काढले. या देशाच्या इतिहासाचा शोध घेऊन. त्याचे पुनर्लेखन करायला प्रारंभ केला. ते याच देशात राहणाऱ्या काही लोकांना पचले नाही. म्हणून ब्रिटिशांच्या विरुद्ध असहकाराचा लढा सुरू झाला. ब्रिटिश खुप चांगले होते, या देशातील लोकांवर त्यांनी अन्याय-अत्याचार केलेच नाहीत. हे कुणीही मान्य करणार नाही. ते मलाही मान्य नाही. पण ब्रिटिशांना राजाश्रय देऊन, भारतावर राज्य करायला लावणारे भारतीय राजेच होते. पुण्याच्या 'लाल महाला'वर ब्रिटिशांचा 'युनियन जैक' फडकवणारेही भारतात राहणारेच लोक होते. सत्ता प्रस्थापित करताना ब्रिटिशांना मदत करणारे अनादी काळापासून भारतात राहणारेच लोक होते. याची मला व्यक्तीशः वेदना होते. ते कुणीही असले तरी राष्ट्रद्रोही म्हणून त्यांना आपण दोषी का मानत नाही. त्यांना आपण शिक्षा का करत नाही. त्याउलट अशा विरोधकांच्या हाती, भारताची सत्ता सोपवून, आपणच आपल्या मुक्तीसाठी आंदोलने का करत आहोत. का आपण नीतीभ्रष्ट लोकांना 'शासन' करत नाही, शिक्षा देत नाही, खुर्चीवरून खाली खेचत नाही. देशाची शैक्षणिक व्यवस्था मोडकळीस आणणारी सत्ता, देशातल्या शेतकऱ्यांचे, बेरोजगार तरुणांचे शोषण करणारी सत्ता, महिलांचे शोषण करणारी सत्ता, आपण का नाकारत नाही..? अंधभक्त होऊन त्यांच्या पाठीशी का उभे राहतो, यात कुठे देशभक्ती दिसते..? केवळ ब्रिटिशांच्या विरुध्द लढणे, हातात तलवारी घेणे आणि बंदुकांचा वापर करणे म्हणजेच स्वातंत्र्य लढा होतो, हा आपला भ्रम डोक्यातून काढून टाकला पाहिजे. ऐतिहासिक संदर्भासह आपला स्वतःचा देश निर्माण करणे, भारतातून नष्ट केली गेलेली, २३ प्राचीन विद्यापीठांची शैक्षणिक व्यवस्था पनर्स्थापित करणे व देशातील सर्व नागरीकांना शिक्षणाचा मुलभुत अधिकार देऊन, त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य बहाल करणे, भारतीय नागरीकांसाठी नागरी व्यवस्था व मुलभूत सुविधाबरोबरच त्यासंबंधीचा मूलभूत हक्क देऊन, पुन्हा एकदा नागरीकांचा भारत निर्माण करणे, हा सर्वात मोठा स्वातंत्र्यलढा होता. रक्ताचा एकही थेंब सांडू न् देता घडवून आणलेली ही जगातील एकमेव क्रांती आहे. याविषयीचा भारतीय नागरिक म्हणून आपल्याला आदर का वाटू नये..? राष्ट्रनिर्माण, भारतीय नागरीकांचे मानसिक परिवर्तन घडवून आणणे हे सर्वात मोठे आणि अमुल्य कार्य मानले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा देश या अर्थाने पुनर्स्थापित केला. 'लोकसत्ताक राष्ट्र' निर्माण केले. आजच्या राज्यकर्त्यांना हे राष्ट्र लोकांचे व्हावे असे अजूनही वाटत नाही. सत्ता माझ्यानंतर माझ्या मुलाकडे, मुलानंतर नातवाकडेच दरपिढ्या हस्तांतरित झाली पाहिजे. त्यासाठी मतांची सर्रास विक्री होताना दिसते. मतदारांबरोबरच आमदार-खासदार व लोकप्रतिनिधी खरेदी करणे, हा राजकीय पुढाऱ्यांचा व्यवसाय बनला आहे. 'माझा मतदारसंघ, माझी जहागिरी' अशी व्यवस्था इथे विकसित केली जात आहे. आज घडीला देशात राजकारणातील सर्व गुन्हेगारांना एकत्र करून, सत्ता केंद्रित केली जात आहे. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत निस्वार्थपणे व राष्ट्रीयत्त्वाचा आदर करून, हे राष्ट्र नागरिकांच्या नावे केले, हे त्यांचे सर्वात मोठे राष्ट्रीय कार्य आहे. बाबासाहेबांनी दिवस-रात्र एक करून, देशासाठी संविधान लिहिले. ते सुद्धा जर कथा कादंबरी लिहीत बसले असते, तर कदाचित अण्णाभाऊंच्या बरोबरीचे साहित्यिक राहिले असते. पण बाबासाहेबांना या देशातील हजारो वर्षाचा इतिहास बदलायचा होता. देशातील सर्व नागरिकांना स्वावलंबी, स्वाभिमानी व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे उपभोक्ते बनवायचे होते. भारतीयांनी गमावलेले माणूसपण व स्वतःचा आत्मसन्मान त्यांना परत बहाल करायचा होता. प्राचीनतम 'सुवर्णभारत' त्यांना पुनर्स्थापित करायचा होता. आणि हे कार्य अत्यंत निष्ठेने व राष्ट्रीयत्त्वाच्या असीम भावनेने, बाबासाहेबांनी त्यांच्या हयातीतच पूर्ण केले. शेकडो राष्ट्रपुरुषांचे कार्य एकट्या बाबासाहेबांनी पूर्ण केले. हे मी व्यक्ति प्रेमातून लिहीत नाही, तर अभ्यासांती हाती आलेल्या निष्कर्षातून लिहित आहे. मातंग समाजाला जोडण्यासाठी अण्णाभाऊंचा फोटो बाबासाहेबांसोबत लावला हे ठीक आहे. पण राजकारण, समाजकारण आणि राष्ट्रीयत्त्व याला वेगळ्या पद्धतीने समजून घेता आले पाहिजे. पण काही जातीनिष्ठ राजकीय पुढाऱ्यांनी, बाबासाहेब विरुद्ध लहुजी साळवे मुक्ता साळवे, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे असे चित्र उभे केले आहे. अण्णाभाऊ साठेच्या लेखनातून लहुजी साळवे यांचा उल्लेख का टाळला असेल. किंवा जर अण्णाभाऊंना बाळ गंगाधर टिळक हे गुरुस्थानी मानत होते तर त्यांच्या 'केसरी' या वर्तमानपत्रातून अण्णाभाऊंच्या मृत्यूची बातमी का छापली नसेल..? याचा शोध घेणे गरजेचे आहे. श्रेष्ठ साहित्यिक म्हणून अण्णाभाऊ यांचा आदर झालाच पाहिजे. कारण सामाजिक परिवर्तनाला मदत करणारे, राष्ट्रीयत्त्वाला प्रेरणा देणारे साहित्य त्यांनी लिहिले. हे कुणालाही नाकारता येणार नाही. डॉ. बाबासाहेबांच्या आंदोलनाची भूमिका त्यांच्या समग्र साहित्यातून प्रकट झाली आहे, हेही कुणाला नाकारता येणार नाही. पण अण्णाभाऊंनी स्वतंत्र अशी विचारधारा मांडली नाही. मात्र त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय विचारांना साहित्याच्या माध्यमातून स्वीकारले. त्यांनी कामगार, शोषित स्त्रिया व दलितांच्या वेदना साहित्यातून मांडल्या. अण्णाभाऊ साठे हे मार्क्सवादी असोत की, आंबेडकरवादी असोत त्या दोन्ही विचारधारेला पूरक असे साहित्य लेखन ते करतात हे महत्त्वपूर्ण आहे. देशाच्या आंदोलनात सहभागही नोंदवतात. जात आणि अस्पृश्यतेची भावना नष्ट झाली पाहिजे, ही संवेदना ते आपल्या कथा कादंबरीतून अविष्कृत करतात. वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारतात. पण त्याचे प्रत्यक्ष नेतृत्व ते कुठेच करत नाहीत. मातंग समाजाच्या मुक्तीचे आंदोलन व त्याचे नेतृत्व त्यांनी कुठे केल्याचे वाचण्यात आणि ऐकिवात नाही. मात्र अण्णाभाऊंचे साहित्य हे बुद्ध ('फकिरा' कादंबरी, 'जग बदल घालुनी घाव, सांगूनि गेले मज भीमराव' हे कवन व 'बुध्दाची शपथ' ही कथा) आणि बाबासाहेबांना व त्यांच्या विचारांना जोडण्याची प्रेरणा देणारे ठरते, हे विशेष आहे. शुध्द राजकीय हेतू बाळगून काही राजकारण्यांनी जाती जोडण्यासाठी (तोडण्यासाठी नव्हे!) प्रत्येक जातीतल्या संत-महापुरुषांना फोटोच्या रांगेत जोडून संख्यात्मक राजकारण करण्याचा प्रयत्न केला. बाबासाहेबांनी मांडलेली प्रवर्गाची संकल्पना लाभार्थी राजकारण्यांनी नीटपणे समजून घेतली नाही. राजकीय लाभ घेण्याच्या अभिलाषेतून या अक्षम्य चुका झाल्यामुळेच, जातीचे उपवर्गीकरण करून, एकसंघ भारत व नागरिक तोडण्याचे काम शत्रूंना सोपे झाले. सामाजिकतेचे भान विसरून, राजकीय आकांक्षा व अभिलाषा वाढल्यामुळेच या अक्षम्य चुका झाल्या, हेही लक्षात ठेवावे लागेल. या दृष्टीने महार आणि मातंगा बरोबरच, देशातील विविध जातींमध्ये असलेले भेद उजागर होत गेले. जाती मजबूत होत गेल्या. त्यापाठीमागे सामाजिक मुल्य राहिले असते तर कदाचित हे चित्र वेगळे राहिले असते.अण्णाभाऊ दीड दिवसात शाळा सोडतात आणि बाबासाहेब वर्गाच्या बाहेर बसून व आपमान सहन करुन देखील शाळा कधीच सोडत नाहीत. आणि पुढे त्याच शिक्षणाने मिळवलेल्या अचाट बुद्धिमत्तेतून भारतातील समग्र नागरिकांच्या मुक्तीचे आंदोलन यशस्वीपणे पुर्ण करतात, वैदिक व्यवस्थेने प्राचीन विद्यापीठे उध्वस्त करून धर्मपिठांची निर्मिती केली, भारतीय नागरिकांवर आठ प्रकारच्या बंदी लाभल्या. स्त्रियांचे हक्क काढून घेतले. त्यांना शाळेत प्रवेश नाकारला. देशात मुनुस्मृती लागू केली व राजसत्तेवर स्वतःचा अंकुश निर्माण केला. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिकूल परिस्थितीतही उच्च शिक्षण घेऊन, जगातील सर्वोच्च पदव्या मिळवल्या व भारतातील सर्व नागरिकांसाठी लाखो शाळा, हजारो महाविद्यालये व शेकडो विद्यापीठे पुनर्स्थापित केली. यातून केवळ बाबासाहेबांच्या राष्ट्रीयत्त्वाचे कार्यच उजागर होते. ना यात अण्णाभाऊंचे काही योगदान आहे, ना लहुजींचे आहे! ना या देशातील अन्य कुण्या राजकीय व्यक्तीचे वा महापुरुषांचे आहे! महापुरुषांच्या जातीनिहाय तुलना करण्यापेक्षा त्यांनी निर्माण केलेल्या विचारधारा मानवी जीवनशैलीशी जोडून माणूस म्हणून स्वावलंबी बनणे व विकसित होणे हेच महत्वपूर्ण असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा व्यक्तिगत द्वेष करणाऱ्यांनी व जाती गोंजारणाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या उंचीचा महापुरुष आणि राष्ट्रपुरुष या देशात दुसरा कुणीही झाला नाही. हे आजचे राष्ट्रीय वास्तव आहे.

**- प्रा. डॉ. सिध्दोधन**
**मो. नं. ९४२०६७१७५०**